नागपुरातील कौशल्य विकास विद्यापीठासाठी जागेचा निर्णय महिनाभरात: मुख्यमंत्री फडणवीस >> पान 2

आषाढी वारीत ७.४७ लाखांहून अधिक वारकऱ्यांना मोफत आरोग्य सेवा >> पान 3

आषाढी एकादशीनिमित्त भाविकांची सेवा; किशोरभाऊ गारोळे यांच्या लोकप्रियतेची पुन्हा प्रचिती >> पान 4


**सुविचार**

धैर्य आणि संयम हे यशाचे खरे साथीदार आहेत.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 12 ■ सोमवार, दि. 27 जुलै 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





सनी देओल अभिनीत बटवारा १९४७ चित्रपटाला मिळाले केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाकडून ए प्रमाणपत्र...

आतील पान

## व्हायब्रंट व्हीलेज प्रोग्राम २०२६ कार्यक्रम, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे तरुणाई आणि पर्यटकांना आवाहन



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी २६ जुलैला व्हायब्रंट व्हीलेज प्रोग्राम २०२६ या कार्यक्रमाअंतर्गत तरुणांशी व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधला. मोदींनी या कार्यक्रमात तरुणांसोबत अनेक विषयांवर चर्चा केली. तसेच एकट्यानं प्रवास करणं म्हणजे जगाला आणि स्वत:ला जाणून घेण्याचा एक मार्ग असल्याचं मोदींनी नमूद केलं.

**सीमावर्ती गावांकडे दुर्लक्ष झालं होतं**

मी राजकारणात येण्यापूर्वीही वारंवार सीमावर्ती गावांना भेट द्यायचो. मी गेल्या २५ वर्षांपासून सीमेवर शूर सैनिकांसोबत दिवाळी साजरी करत आहे. सीमावर्ती गावांकडे दुर्लक्ष झालं होतं. तिथं मूलभूत सुविधांचा अभाव होता. मात्र सरकारने आता या भागांना देशातील पहिली गावे म्हणून मान्यता दिली आहे, असं मोदींनी म्हटलं.

**मोदींचं तरुणांना आवाहन**

मोदींनी या वेळेस विविध जिल्ह्यातील तरुणांना सीमावर्ती भागातील गावांना भेट देऊन तिथल्या राहणीमानाबाबत जाणून घेण्याचं आवाहन केलं. मोदींनी तरुणांना हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि लडाखमधील गावांना भेट देऊन तिथल्या जीवनशैलीबद्दल जाणून घेण्याबाबत म्हटलं. एकेकाळी ओसाड असलेली गावं आता गजबजली आहेत. त्या गावात मुलं-मुली शाळा आणि महाविद्यालयांमध्ये जात आहेत, असं मोदींनी सांगितलं.

**सीमावर्ती भागांमध्ये महत्त्वपूर्ण बदल**

मोदींनी सीमावर्ती भागात बदल घडत असल्याचं तरुणांसोबत संवाद करताना म्हटलं. सीमावर्ती भागांमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडत आहेत. गावांना पहिल्यांदाच वीज, रस्ते, नळाचं पाणी आणि गॅस कनेक्शन मिळत आहेत. या सुविधा जीवन बदलणाऱ्या आहेत. तसंच गावांमध्ये सतत प्रगती होत आहे. ४०० पेक्षा अधिक निवड झालेल्या तरुणांनी दुर्गम गावांत एक आठवडा घालवला. हे तरुण स्थानिक संस्कृतीशी एकरूप झाले. हा कार्यक्रम एक भारत श्रेष्ठ भारतचं एक उदाहरण आहे, असं मोदींनी स्पष्ट केलं.

**तरुणाईबद्दल मोदी काय म्हणाले?**

आजची तरुण पिढी ही विकसित भारताची ताकद आणि विकसित भारताची सर्वात मोठी लाभार्थी आहे. रोजगाराला चालना देण्यासाठी आणि स्थानिक अस्मितेला प्रोत्साहन देण्यासाठी पर्यटकांनी आपल्या बजेटमधील किमान ५ टक्के रक्कम स्थानिक पातळीवर खर्च करावी, असं आवाहनही पंतप्रधानांनी पर्यटकांना केलं.

**आनंद वाटल्यास द्विगुणीत होतो**

जेव्हा तुम्ही आनंद वाटता, तेव्हा तो अनेक पटींनी वाढतो, असं पंतप्रधान मोदींनी नव्याने विकसित केलेल्या व्हायब्रंट व्हीलेजेस कार्यक्रमातील स्वयंसेवकांना सांगितलं. तसेच मोदींनी तरुणांना त्यांचे अनुभव इतरांना सांगण्याचा सल्ला दिला. तुमचे अनुभव लिहून काढा आणि ते इतरांना सांगा. तंत्रज्ञान भारताच्या कानाकोपऱ्यात पोहोचलं आहे. जे एकेकाळी प्राधान्यक्रमात सर्वात तळाशी होतं, ते आता अग्रस्थानी आहेत, असं मोदींनी सांगितलं.

### आता भाजपने मागितला पंजाबच्या शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा; पेपर फुटीवरुन काँग्रेसही आक्रमक, मुख्यमंत्री मान काय म्हणाले?

**पंजाब/वृत्तसंस्था :** नीट पेपरफुटी प्रकरणी ३६ दिवस आंदोलन केल्यानंतर शनिवारी अखेर धर्मेंद्र प्रधान यांनी शिक्षण मंत्रीपदाचा राजीनामा दिला. प्रधान यांच्या राजीनाम्याचे प्रकरण ताजे असताना आता पंजाबमध्ये राजकारण तापले आहे. पेपरफुटी प्रकरणावरुन भाजपाने पंजबाचे शिक्षण मंत्री हरजोत सिंग बैन्स यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. विविध परीक्षांचे पेपर फुटल्याचा दावा भाजपाने केला आहे. राज्याचे मुख्यमंत्री भगवंत सिंग मान यांनी मात्र पेपरफुटीचे आरोप फेटाळून लावले आहेत.

पंजाबचे शिक्षणमंत्री राजीनामा कधी देणार? अरविंद केजरीवाल नैतिकतेच्या आधारावर पंजाबच्या शिक्षणमंर्त्याचा राजीनामा कधी मागणार? असा प्रश्न भाजपाचे प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी विचारला. भंडारी यांनी पीएसईबी इयत्ता १२ वी इंग्रजी बोर्ड परीक्षा, पंजाब राज्य शिक्षक पात्रता चाचणी (पीएसटीईटी) आणि कृषी विकास अधिकारी (एडीओ) परीक्षेत पेपरफुटी झाल्याचा आरोप केला आहे. भंडारी यांनी पंजाब सेवा निवड मंडळ (पीएसएसएसबी) गट-ब आणि संयुक्त भरतीमध्ये अनियमितता झाल्याचाही आरोप केला.

## मुंबईत ठाकरेंची जल्लोष सभा

### अंधभक्तांच्या विरोधात देशभक्त जिंकले – उद्धव ठाकरे; राज ठाकरेंकडून आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांना आदरांजली



**मुंबई । प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांच्या आंदोलनासमोर केंद्र सरकारलाही झुकावे लागले आणि केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा लागला. याच पार्श्वभूमीवर मुंबईत ठाकरे बंधूंची जल्लोष सभा आयोजित करण्यात आली आहे. ही सभा मुंबईच्या सावरकर मार्गावर आयोजित करण्यात आली.

शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांच्यासह दोन्ही पक्षातील नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने या जल्लोष सभेत उपस्थित होते. यावेळी राज ठाकरे यांनी आत्महत्या केलेल्या सर्व २१ विद्यार्थ्यांचे नाव घेत त्यांना आदरांजली वाहिली. तसेच उद्धव ठाकरे यांनी हा लढा देशभक्त विरुद्ध अंधभक्त असा होता आणि आपण तो जिंकला, असे विधान केले.

सभेनंतर राष्ट्रगीताने सभेची सांगता करण्यात आली. त्यानंतर वंदे मातरम् हे गाणे लावले गेले. यावेळी सर्वांनी तिरंगा फडकवत गाण्याचा आस्वाद घेत विजयाचा जल्लोष साजरा केला.

दिल्लीत महिनाभरापासून कॉक्रोच जनता पार्टीसह देशभरातील लाखो विद्यार्थ्यांनी आंदोलन पुकारले होते. त्यात सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी देखील २० दिवस उपोषण केले होते. त्यानंतर त्यांना पोलिसांनी बाळाचा वापर करत उचलून नेले होते. या घटनेनंतर विद्यार्थी चांगलेच आक्रमक झाले व त्यांनी चलो संसद मोर्चा काढला, या मोर्चावर पोलिसांनी लाठी चार्ज केला होता. यानंतर देखील विद्यार्थ्यांनी कशालाही न जुमानता आपले आंदोलन सुरूच ठेवले. याचा परिणाम म्हणजे >> पान ३

## विद्यार्थ्यांना मारण्याचा आदेश कोणी दिला?

### राहुल गांधींचं अमित शाहांना खरमरीत पत्र; विचारले दोन तिखट सवाल

**दैनिक आपला विदर्भ**



**मुंबई । प्रतिनिधी :** काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान झालेल्या लाठीमार आणि पॅलेट गन वापराच्या आरोपांवरून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र लिहित केंद्र सरकारला धारेवर धरले आहे. विद्यार्थ्यांवर लाठीमार करण्याचे आदेश कोणी दिले, तसेच पॅलेट गन वापरण्याची परवानगी कोणी दिली, असे दोन थेट सवाल राहुल गांधी यांनी पत्रातून उपस्थित केले आहेत.

२० जुलै रोजी 'संसद चलो' मोर्चादरम्यान जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी लाठीमार आणि अश्रुधुराच्या नळकांड्यांचा वापर केला होता. या घटनेनंतर राहुल गांधी यांनी रविवारी (२६ जुलै) अमित शाह यांना पत्र पाठवून या कारवाईची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी केली. पत्रात राहुल गांधी यांनी म्हटले आहे की, विद्यार्थी निष्पक्ष आणि जबाबदार शिक्षण व्यवस्थेची मागणी करत शांततेच्या मार्गाने आंदोलन करत होते. मात्र त्यांच्या मागण्या ऐकून घेण्याऐवजी सुरक्षा दलांनी अतिप्रमाणात बळाचा वापर केल्याचा आरोप त्यांनी केला.

राहुल गांधी यांनी पत्रात दावा केला आहे की, पोलिसांच्या लाठीमारामुळे शेकडो विद्यार्थी गंभीर जखमी झाले. महिला विद्यार्थिनींनाही मारहाण करण्यात आली असून, त्यांच्याशी गैरवर्तन झाल्याचे आरोपही त्यांनी पत्रात नमूद केले आहेत. पत्रात राहुल गांधी यांनी पॅलेट गनचा वापर सर्वाधिक धक्कादायक असल्याचे म्हटले आहे. प्रसारमाध्यमे आणि समाजमाध्यमांवरील दृश्यांमध्ये पत्रकारासह अनेक जण गंभीर जखमी झाल्याचे दिसत असल्याचा दावा त्यांनी केला. राहुल गांधी यांनी १९ वर्षीय विद्यार्थी साहिल लोचब याची भेट घेतल्याचे सांगत, पॅलेट गनच्या गोळीमुळे त्याच्या एका डोळ्याची दृष्टी जाण्याची शक्यता असल्याचा उल्लेखही पत्रात केला आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना उद्देशून राहुल गांधी यांनी दोन महत्त्वाचे प्रश्न विचारले आहेत. विद्यार्थ्यांविरोधात पॅलेट गनसारख्या घातक साधनांचा वापर करण्यास तुम्ही गृहमंत्री म्हणून मंजुरी दिली होती का? जर नाही, तर ही परवानगी कोणी दिली? साध्या वेशात विद्यार्थ्यांना लाठ्यांनी मारहाण करताना दिसणारे लोक पोलीस कर्मचारी होते की स्वयंसेवक? त्यांच्या तैनातीला अधिकृत मान्यता कोणी दिली? असे प्रश्न राहुल गांधींनी विचारले आहेत. राहुल गांधी यांनी या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून जबाबदार व्यक्तींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## इराणवरील सर्वात मोठ्या हल्ल्यापासून ट्रम्प यांची सपशेल माघार, लष्कराला कारवाई थांबवण्याचे निर्देश



**दिल्ली/वृत्तसंस्था :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवरील सर्वात मोठा हल्ला तात्पुरता थांबवला आहे. 'द न्यूयॉर्क टाइम्स' आणि 'ॲक्सिऑस'च्या वृत्तानुसार, शुक्रवारी वरिष्ठ सल्लागार आणि मंत्रिमंडळाच्या सदस्यांसोबत बैठक घेतल्यानंतर ट्रम्प यांनी लष्कराला कोणतेही नवीन मोठे हल्ले थांबवण्याचे आदेश दिले. वृत्तानुसार, अमेरिकेच्या लष्करी अधिकाऱ्यांनी इशारा दिला होता की, जर ही कारवाई आणखी वाढली, तर मध्य-पूर्वेत तैनात असलेल्या अमेरिकन लष्कराचा पॅट्रियट इंटरसेप्टर क्षेपणास्त्रांचा आणि इतर हवाई संरक्षण शस्त्रांचा साठा मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतो.

जॉइंट चीफ्स ऑफ स्टाफचे अध्यक्ष जनरल डॅन केन यांनी सल्ला दिला की, एका मोठ्या कारवाईमुळे मध्य-पूर्वेत तैनात असलेल्या अमेरिकन सैन्याच्या आणि मित्र राष्ट्रांच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो. या वृत्तानुसार, एप्रिल महिन्याच्या अखेरपर्यंत अमेरिकेने १,२०० हून अधिक पॅट्रियट इंटरसेप्टर क्षेपणास्त्रे तैनात केली होती. 'ॲक्सिऑस'च्या वृत्तानुसार, हल्ले थांबवण्याचा हा निर्णय तात्पुरता आहे की दीर्घकालीन असेल, हे अद्याप स्पष्ट नाही. तथापि, गरज भासल्यास अमेरिकन लष्कर मोठ्या लष्करी कारवाईसाठी सज्ज आहे.

**इराणचे नवीन सर्वोच्च नेते अणुशस्त्रांच्या बाजूने**

न्यूयॉर्क टाइम्सच्या एका अहवालानुसार, अमेरिकी गुप्तचर संस्थांना असे वाटते की इराणचे नवीन सर्वोच्च नेते, अयातुल्ला मोजतबा खामेनी, हे त्यांचे वडील आणि माजी सर्वोच्च नेत्यांपेक्षा अणुशस्त्रे विकसित करण्याच्या अधिक बाजूने आहेत. अमेरिकी अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की इराणने आपला अणुकार्यक्रम पुन्हा सुरू केल्याचा सध्या कोणताही पुरावा नाही. मात्र, गेल्या वर्षीच्या अमेरिकेच्या हल्ल्यांनंतर आणि सध्याच्या युद्धाच्या मधल्या काळात, इराणने आपल्या अणुसंपत्तीचे संरक्षण करण्यासाठी पावले उचलली आहेत.

### विदर्भ राज्याच्या मागणीसाठी फडणवीस-गडकरी यांच्या घरासमोर मोर्चाचा इशारा

>> पान ४




## उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आज मेहकर तालुक्यात विविध सामाजिक उपक्रम

### आमदार सिद्धार्थ खरात यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण, फळवाटप, शालेय साहित्य वितरणासह विविध कार्यक्रम

**दैनिक आपला विदर्भ**





**मेहकर । प्रतिनिधी :** शिवसेना पक्षप्रमुख मा. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवार (दि. २७) रोजी मेहकर-लोणार मतदारसंघात विविध सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरण व आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

आमदार सिद्धार्थ खरात यांच्या मार्गदर्शनाखाली हे कार्यक्रम पार पडणार असून, शिवसैनिकांसह नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता मेहकर येथील शारंगधर बालाजी मंदिरात उद्धव ठाकरे यांच्या दीर्घायुष्यासाठी विशेष प्रार्थनेने होणार आहे. त्यानंतर सकाळी १० वाजता पंचायत समिती कार्यालय, मेहकर येथे वृक्षारोपण, सकाळी १०.३० वाजता ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळवाटप, तर सकाळी ११ वाजता खंडाळा येथील तहसील कार्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

यानंतर सकाळी ११.३० वाजता हिवराश्रम येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात येईल. दुपारी १२ वांगजता लोणार येथील कमळजा माता देवी मंदिरात उद्धव ठाकरे यांच्या दीर्घायुष्यासाठी विशेष प्रार्थना करण्यात येणार आहे. यासोबतच सकाळी १० वाजता मेहकर येथील आमदार जनसंवाद कार्यालयात सर्व शिवसैनिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले आहे. शिवसेना, युवा सेना, महिला आघाडीचे तालुकाप्रमुख, विभागप्रमुख व इतर पदाधिकाऱ्यांनी आपल्या-आपल्या विभागात वृक्षारोपण, फळवाटप, शालेय साहित्य वितरण व अन्य सामाजिक उपक्रम राबवावेत, तसेच उद्धव ठाकरे यांचे विचार, पक्षाची भूमिका आणि सामाजिक कार्याची माहिती जनतेपर्यंत पोहोचवावी, असेही त्यांनी म्हटले आहे. उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस केवळ उत्सव म्हणून नव्हे, तर समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करून सामाजिक बांधिलकीचा संदेश देण्याचा प्रयत्न असल्याची भावना शिवसैनिकांनी व्यक्त केली असून, सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### टीम इंडिया पुन्हा नंबर १, आयसीसी रँकिंगमध्ये इंग्लंडची घसरण, १५ दिवसात गमावलं अव्वल स्थान

**दैनिक आपला विदर्भ**

नवी दिल्ली : टी२० वर्ल्ड कप २०२६ च्या विजेत्या भारतीय संघाने वर्ल्ड कपनंतर श्रेयस अय्यरच्या नेतृत्वात मात्र आयर्लंड आणि इंग्लंड विरुद्ध टी२० सीरिजमध्ये पराभूत होऊन आयसीसी रँकिंगमधील नंबर १ चं स्थान गमावलं होतं. इंग्लंड विरुद्ध टीम इंडियाच्या टी२० संघाला ४-० ने लाजिरवाणा पराभव मिळालेला. त्यामुळे टी२० फॉरमॅटच्या आयसीसी टीम रँकिंगमध्ये मागील अनेक वर्षांपासून नंबर १ वर असलेल्या टीम इंडियाची घसरण झालेली तर इंग्लंडचा संघ भारताला क्लीन स्वीप देऊन नंबर दोनवर घसरला होता. मात्र आता झिम्बाब्वे विरुद्ध सलग दुसऱ्या सामन्यात टीम इंडियाचा विजय झाल्याने आयसीएस रँकिंगमध्ये पुन्हा बदल होऊन ते नंबर १ वर पोहोचले आहे.

## जनआंदोलनांनी अनेकदा सत्तेची दिशा बदलली

भारतीय लोकशाहीत जनआंदोलनांनी अनेकदा सत्ताधाऱ्यांना माघार घ्यायला भाग पाडले आहे. स्पर्धा परीक्षा, पेपरफुटी आणि तरुणांच्या भविष्याच्या प्रश्नांवर उभ्या राहिलेल्या विद्यार्थी आंदोलनाने ते पुन्हा एकदा अधोरेखित केले.

भारतीय लोकशाहीमध्ये रस्त्यावरील जनआंदोलनांनी अनेकदा सत्तेची दिशा बदलली आहे. १९७४ मधील गुजरातचे नवनिर्माण आंदोलन, २०११ मधील अण्णा आंदोलन किंवा २०२१ मधील दिल्लीतील शेतकरी आंदोलन असो, या सर्वांनी हे सिद्ध केले आहे की, जनआक्रोशाला व्यापक सामाजिक पाठिंबा मिळाला, तर कितीही मजबूत सरकार असले, तरी त्याला आपली रणनीती बदलावी लागते. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हा त्याच राजकीय परंपरेतील नवा अध्याय मानला जात आहे. मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात जनतेच्या व्यापक दबावामुळे सरकारला माघार घ्यावी लागलेली ही तिसरी मोठी घटना आहे. यापूर्वी जमीन अधिग्रहण अध्यादेश मागे घेणे, तीन कृषी कायदे रद्द करणे आणि आता शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा, या घटनांमधून हे स्पष्ट होते की, ठाम आणि निर्णायक नेतृत्वाची प्रतिमा असलेले सरकारही राजकीय किंमत वाढू लागल्यावर आपली भूमिका बदलते. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हा केवळ एका मंत्र्याचा राजीनामा नाही. स्पर्धा परीक्षांची विश्र्वासार्हता, पेपरफुटी, तरुणांच्या भविष्याची चिंता आणि सरकारचे उत्तरदायित्व या मुद्द्यांवर देशभरात निर्माण झालेल्या असंतोषाची ती एक प्रकारची कबुली आहे. सरकारने हा प्रशासकीय निर्णय असल्याचे म्हटले, तर विरोधकांनी तो विद्यार्थ्यांच्या विजयाचे प्रतीक असल्याचे सांगितले. या आंदोलनाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, त्याचे स्वरूप. शेतकरी आंदोलनाला स्पष्ट नेतृत्व होते. नागरिकत्व दुरुस्ती कायद्याविरोधातील आंदोलनामागेही अनेक संघटित गट होते; मात्र यावेळी आंदोलनाचा कोणताही केंद्रीय नेता नव्हता. सोशल मीडिया, यूट्यूब, इन्स्टाग्राम आणि डिजिटल नेटवर्क हेच या आंदोलनाचे खरे व्यासपीठ बनले. नंतर विरोधी पक्षांनी या आंदोलनाला मोठा पाठिंबा दिला; परंतु आंदोलनाने त्यांना स्वतःचे व्यासपीठ वापरू दिले नाही. विद्यार्थ्यांनी आंदोलनाचे नेतृत्व कोणत्याही राजकीय पक्षाकडे दिले नाही. त्यांनी हा संघर्ष कोणत्याही पक्षाचा किंवा संघटनेचा नसून स्वतःच्या भविष्याचा प्रश्न मानून पुढे नेला. सरकारसमोर हेच सर्वात मोठे आव्हान होते. विद्यार्थ्यांनी आंदोलन गांभीर्याने सुरू ठेवत असतानाच आंदोलनस्थळे 'सेल्फी पॉईंट' आणि उत्साहाचे केंद्र बनवली. त्यामुळे युवकांमध्ये या आंदोलनाविषयी अधिक आकर्षण निर्माण झाले. पारंपरिक राजकारणात सरकार आंदोलनाच्या नेत्यांशी चर्चा करते, तडजोडी करते आणि हळूहळू आंदोलनाची धार कमी करण्याचा प्रयत्न करते; मात्र या आंदोलनात नेतृत्व विखुरलेले होते. सरकारने सोनम वांगचुक यांच्या माध्यमातून आंदोलन संपविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या उपोषणाची सांगता घडवून आणल्यानंतर सरकारला वाटले की, ८० टक्के यश मिळाले; पण सरकारचा अंदाज चुकीचा ठरला. काही प्रमुख चेहऱ्यांनी मवाळ भूमिका घेतली, तरी रस्त्यावर उतरलेल्या विद्यार्थ्यांच्या मागण्या कायम राहिल्या. या आंदोलनाने भाजपच्या त्या रणनीतीला आव्हान दिले, ज्यामध्ये कोणत्याही आंदोलनाला विरोधकांचे राजकारण किंवा मर्यादित हितसंबंधी गटांचे आंदोलन ठरवून त्याचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न केला जात असे. यावेळी मात्र मोठ्या संख्येने असे तरुण रस्त्यावर उतरले होते, जे कोणत्याही वैचारिक संघर्षापेक्षा आपल्या करिअरबाबत आणि स्पर्धा परीक्षांच्या निष्पक्षतेबाबत अधिक चिंतित होते. त्यामुळे हा असंतोष भाजपच्या पारंपरिक सामाजिक आधारापर्यंत पोहोचताना दिसू लागला. याच टप्प्यावर सरकारमध्ये राजकीय चिंता वाढू लागली. आंदोलन नियंत्रणात आणण्यासाठी अवलंबलेली पद्धत आंदोलन शांत करण्याऐवजी अधिक भडकवणारी ठरली. विशेषतः संसद मार्चनंतर आंदोलन अधिक आक्रमक झाले. विद्यार्थ्यांवर झालेल्या कारवाईमुळे देशभरात त्यांच्याविषयी सहानुभूतीची लाट निर्माण झाली आणि आंदोलन राष्ट्रीय स्तरावर पसरले. अशा स्थितीत राहुल गांधी यांनी पंतप्रधान निवासस्थानासमोर धरणे आंदोलन केले. पोलिसांनी त्यांना बळाचा वापर करून हटवल्यानंतर परिस्थिती आणखी चिघळली. त्यानंतर काँग्रेस आंदोलनात उघडपणे सहभागी झाली आणि सरकारची अडचण वाढली. राहुल गांधी स्वतः रस्त्यावर उतरल्याने आंदोलनाला आणखी वेग मिळाला. सुरुवातीला भाजपचे सर्वोच्च नेतृत्व शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या पाठीशी ठामपणे उभे होते. २२ जुलैच्या रात्रीपर्यंत त्यांचा राजीनामा घेतला जाणार नाही, अशीच चर्चा होती; मात्र आंदोलनाचा सातत्याने वाढणारा विस्तार, सोशल मीडियावर सरकार विरोधातील वाढती टीका आणि मित्रपक्षांच्या चिंतेमुळे परिस्थिती बदलली. त्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपच्या नेतृत्वामध्ये उच्चस्तरीय चर्चेत आंदोलनाच्या सामाजिक परिणामांचा आढावा घेण्यात आला आणि सरकारची रणनीती बदलली. या चर्चेत अशीही चिंता व्यक्त केली की, तरुणांचा रोष केवळ शिक्षणमंत्र्यांपुरता मर्यादित राहिलेला नसून त्याचा परिणाम थेट पंतप्रधानांच्या प्रतिमेवर होत आहे. सोशल मीडियातून आंदोलन ज्या वेगाने विस्तारले, त्याने सरकारच्या पारंपरिक संवाद प्रणालीलाच आव्हान दिले. तरुणांशी थेट संवाद साधण्यासाठी नवीन रणनीतीचा विचार करण्यात आला. सुरुवातीला सरकारने विरोधकांवर राजकारणाचा आरोप केला, परीक्षा सुधारण्याची आश्र्वासने दिली आणि काही प्रशासकीय बदल केले; मात्र अधिकाऱ्यांच्या बदल्या किंवा सुधारणा जाहीर करून परिस्थिती नियंत्रणात येणार नाही, हे स्पष्ट झाले. तरुणांना ठोस राजकीय संदेशाची अपेक्षा होती. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हा त्याच संदेशाचा भाग मानला गेला. हा केवळ उत्तरदायित्व निश्र्चित करण्याचा प्रयत्न नव्हता, तर वाढलेले राजकीय तापमान कमी करण्याचाही प्रयत्न होता. आंदोलन दीर्घकाळ सुरू राहिल्यास त्याचा परिणाम केवळ शिक्षण धोरणापुरता मर्यादित राहणार नाही, तर बेरोजगारी, भरती प्रक्रिया आणि शासनाच्या विश्र्वासार्हतेसारख्या व्यापक प्रश्र्नांशी तो जोडला जाईल, याची सरकारला जाणीव झाली होती. या संपूर्ण घटनाक्रमामुळे विरोधी पक्षांनाही नवी ऊर्जा मिळाली. राहुल गांधी, अखिलेश यादव आणि इतर विरोधी नेत्यांनी आंदोलनाला राजकीय पाठिंबा दिला; मात्र आंदोलनाच्या यशाचे संपूर्ण श्रेय विरोधकांना देता येणार नाही, तरीही या आंदोलनामुळे काँग्रेसला नवसंजीवनी मिळाली. उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीपूर्वी समाजवादी पक्षालाही या आंदोलनाचा फायदा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अखिलेश यादव यांच्यापेक्षा त्यांची पत्नी आणि खासदार डिंपल यादव यांनी विद्यार्थ्यांमध्ये जाऊन जणू एकप्रकारे आईचीच भूमिका पार पाडली. त्यामुळे त्यांची लोकप्रियता वाढली आहे. त्याचा लाभ समाजवादी पक्षाला विधानसभा निवडणुकीत होऊ शकतो. तरुणांचा पाठिंबा हा पक्षासाठी मोठा राजकीय लाभ ठरू शकतो. आता सरकारपुढील सर्वात मोठे आव्हान राजीनाम्यानंतर सुरू होते. परीक्षा प्रणाली पारदर्शक करणे, पेपरफुटीवर कठोर कारवाई करणे, भरती प्रक्रियेत सुधारणा करणे आणि तरुणांशी विश्र्वासार्ह संवाद प्रस्थापित करणे, ही कामे झाली नाहीत, तर केवळ नेतृत्व बदलल्याने असंतोष संपणार नाही. आजची तरुण पिढी प्रतीकांपेक्षा प्रत्यक्ष परिणामांची अपेक्षा करते. त्यामुळे धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा भारतीय राजकारणात दीर्घकाळ स्मरणात राहील. कारण, या घटनेने पुन्हा एकदा सिद्ध केले की, लोकशाहीत अंतिम सत्ता जनतेकडेच असते. बहुमताच्या जोरावर सरकारे निवडणुका जिंकू शकतात; मात्र जनतेचा विश्र्वास टिकवून ठेवण्यासाठी त्यांना वेळोवेळी जनतेचा आवाज ऐकावाच लागतो.

# नागपुरातील कौशल्य विकास विद्यापीठासाठी जागेचा निर्णय महिनाभरात: मुख्यमंत्री फडणवीस

## पारडी परिसरात उभारलेल्या 'नागपूर स्कील सेंटर'चे उद्घाटन







**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर। प्रतिनिधी** : जिल्ह्यातील प्रस्तावित कौशल्य विकास विद्यापीठासाठीच्या जागेचा निर्णय महिनाभरात होणार असून हे विद्यापीठ देशातील सर्वोत्तम असे कौशल्य विकास विद्यापीठ ठरावे, अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केली.

विदर्भातील उद्योगांना आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने नागपुरात पारडी परिसरात एआयडी, टाटा स्ट्राईव्ह, नागपूर महानगरपालिका आणि विदर्भ ग्लोबल फाउंडेशनच्या संयुक्त प्रयत्नांतून उभारण्यात आलेल्या नागपूर स्किल सेंटरच्या उद्घाटन समारंभात मुख्यमंत्री फडणवीस हे बोलत होते.

यावेळी केंद्रीय रस्ते विकास आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह महापौर नीता ठाकरे, उपमहापौर लीला हथीबेड, आमदार सर्वश्री कृष्णा खोपडे, संजय भेंडे, डॉ. राजीव पोतदार, माजी खासदार अजय संचेती, स्थायी समिती अध्यक्ष शिवानी दाणी, महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शिक्षणाच्या माध्यमातून युवकांना कौशल्य कितपत आत्मसात करता येते आणि रोजगाराच्या दृष्टीने त्याचा कितपत उपयोग होतो, याचा पूर्वी विचार झाला नव्हता. २०१४ पासून खऱ्या अर्थाने कौशल्य विकास या विषयाला महत्त्व देण्याचे धोरण राबविण्यात आले. आज उद्योग आणि व्यवसायात रोजगाराच्या दृष्टीने कौशल्य विकासाला अत्यंत महत्त्व आले आहे. एकीकडे युवकांपुढे रोजगाराची समस्या असताना दुसरीकडे उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होत नसल्याची अडचण होती. रोजगार मोठ्या प्रमाणात उपलब्ध असताना त्यांचा लाभ स्थानिक युवकांना घेता यावा, या दृष्टीने कौशल्य विकास केंद्राची कल्पना पुढे आली असल्याचे ते म्हणाले.

विदर्भात मोठ्या प्रमाणात सोलर, इलेक्ट्रीक वाहन, आरोग्य तसेच लोहखनिज प्रकल्पांची इकोसिस्टीम आकारास येत असल्याच्या पार्श्वभूमीवर या उद्योगांना मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळाची गरज भासणार आहे. या विचारातूनच कौशल्य विकासावर भर देण्यात येत आहे, असे ते म्हणाले.

प्रस्तावित कौशल्य विकास विद्यापीठाच्या माध्यमातून अत्यंत दर्जेदार व आधुनिक गरजांना साजेसे असे कुशल मनुष्यबळ तयार होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, युवकांना सध्या जे कौशल्य प्रशिक्षण दिले जातेय, त्यातून ७५ टक्के युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध होत आहे. हे प्रमाण ९० टक्क्यांपर्यंत नेण्याचे ध्येय बाळगले पाहिजे. त्या दृष्टीने सर्वच स्तरांवर प्रयत्न सुरु आहेत.

**विदर्भातील युवकांना मोठा लाभ होईल : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी**

कौशल्य विकास केंद्र आणि प्रस्तावित असलेल्या कौशल्य विकास विद्यापीठामुळे रोजगारक्षम बनण्याच्या दृष्टीने विदर्भातील युवकांना मोठ्या प्रमाणात लाभ होईल आणि उद्योगांनाही मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळ उपलब्ध होईल, असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी व्यक्त केला. गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात लोहखनिज उद्योगांत गुंतवणूक येत आहे. याशिवाय विविध क्षेत्रातील उद्योग नागपूर व विदर्भात येत असून या उद्योगांना स्थानिक पातळीवरच कुशल मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कौशल्य विकास केंद्राची भूमिका महत्त्वाची राहणार आहे. विदर्भातील मुलांना या सुविधांचा निश्चितच मोठा लाभ होणार आहे, असा विश्वासही केंद्रीय मंत्री गडकरी यांनी यावेळी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्यमंत्री फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन पार पडले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी या केंद्रात प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांशी संवादही साधला. कार्यक्रमात एआयडीच्यावतीने चंद्रपूर किंवा गडचिरोली जिल्ह्यात एकात्मिक पोलाद उत्पादन प्रकल्प उभारण्यासाठीचे एक स्वारस्यपत्र मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. याशिवाय असोसिएशन फॉर इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट आणि नॅशनल अकॅडमी फॉर डिफेन्स प्रॉडक्शन यांच्यात यावेळी एक सामंजस्य करार झाला. स्थायी समितीच्या अध्यक्ष शिवानी दाणी, महापालिकेचे आयुक्त डॉ. विपिन इटनकर, असोसिएशन फॉर इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे, टाटा स्ट्राईव्हचे अमेय वंजारी यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# वेटलिफ्टर मीराबाई चानूची सुवर्णपदकांची हॅटट्रिक! नवा विक्रम करत रचला इतिहास; भारताच्या झोळीत तिसरं पदक



**दैनिक आपला विदर्भ**

**ग्लासगो/वृत्तसंस्था** : भारतीय वेटलिफ्टिंगची राणी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सैखोम मीराबाई चानूनं आंतरराष्ट्रीय स्तरावर पुन्हा एकदा भारताचा तिरंगा उंचावला आहे. २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत महिलांच्या ४८ किलो वजनी गटातील मीराबाईच्या उत्कृष्ट कामगिरीमुळं भारताला सुवर्णपदक मिळाले आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या इतिहासातील हे तिचं सलग तिसरं सुवर्णपदक असून, तिनं नव्या विक्रमासह इतिहास रचला आहे. तसंच २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील भारताचं हे पहिलंच सुवर्णपदक ठरलं आहे.

मीराबाई चानूनं रचला इतिहास : महिलांच्या ४८ किलो वजनी गटात, मीराबाई चानूनं ८५ किलो वजन उचलून इतिहासात आपलं नाव कोरलं. मीराबाईनं आपल्या तिसऱ्या प्रयत्नात सहजपणे ८५ किलो वजन उचलून एक नवीन राष्ट्रकुल विक्रम प्रस्थापित केला. आधी तिनं ८२ किलो वजन उचलून राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचा विक्रम प्रस्थापित केला होता आणि आता ८५ किलो वजन उचलून एक नवीन राष्ट्रकुल विक्रम प्रस्थापित केला आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात कोणत्याही खेळाडूनं उचललेलं हे सर्वाधिक वजन आहे. हे केवळ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धे पुरतं मर्यादित नाही. कोणत्याही प्रमुख आंतरराष्ट्रीय स्पर्धेत (जसं की जागतिक चॅम्पियनशिप, ऑलिम्पिक इत्यादी) राष्ट्रकुल देशातील कोणत्याही खेळाडूनं प्रस्थापित केलेला हा सर्वोच्च विक्रम आहे.

पहिल्या प्रयत्नात अपयश : मीराबाई चानू ८२ किलो वजन उचलण्याच्या आपल्या पहिल्या प्रयत्नात अयशस्वी ठरली. बारबेल डोक्यावर उचलल्यानंतर, ती सरळ उभी राहू शकली नाही. दोन वेळची राष्ट्रकुल विजेती मीराबाई सुरुवातीला आपलं वजन सांभाळत असल्याचं दिसत होतं, परंतु अखेरीस तिचा तोल गेला आणि तिला वजन खाली टाकावं लागलं.

## सनी देओल अभिनीत बटवारा १९४७ चित्रपटाला मिळाले केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाकडून ए प्रमाणपत्र...

**हैदराबाद/वृत्तसंस्था** : सनी देओल अभिनीत बटवारा १९४७ हा चित्रपट पाहण्यासाठी अनेकजण उत्सुक आहेत. आमिर खान प्रॉडक्शन्सच्या बॅनरखाली निर्मित हा चित्रपट या वर्षातील सर्वाधिक चर्चेत असलेला आहे. भारताच्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर आधारित चित्रपटामध्ये प्रेम, त्याग करुणा आणि मानवी संघर्ष दाखविण्यात येणार आहे. आता या चित्रपटाबद्दल एक मोठी माहिती समोर आली आहे. केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळानं चित्रपटाला कोणताही कट न करता मंजुरी दिली आहे. चित्रपटाचा विषय आणि तीव्र दृश्ये लक्षात घेऊन त्याला ए प्रमाणपत्र देण्यात आलं आहे. बटवारा १९४७ चित्रपटाचा रनटाईम हा २ तास २५ मिनिटे आणि ३४ सेकंद आहेत. दरम्यान १९४७च्या फाळणीदरम्यान झालेली जातीय हिंसा या चित्रपटामध्ये दाखविण्यात येणार आहे.

# मुंबईत ठाकरे बंधू आनंदोत्सव साजरा करत असताना शिंदे गटाचा बडा नेता अभिजीत दिपकेंच्या घरी पोहोचला, छत्रपती संभाजीनगरमध्ये मोठी घडामोड

**दैनिक आपला विदर्भ**

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी** : नीट पेपरफुटी प्रकरणात देशभरात तीव्र जनआक्रोश आणि 'जेन झी' विद्यार्थ्यांनी पुकारलेल्या आक्रमक आंदोलनानंतर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा लागलाय. शिक्षणमंत्र्यांनी दिलेल्या या राजीनाम्यानंतर कॉकरोच जनता पार्टीसह देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये जल्लोषाचं वातावरण आहे. अशातच तरुणाईचा आणि विद्यार्थ्यांचा हा मोठा विजय असल्याचे सांगत मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या संयुक्त नेतृत्त्वाखाली आज (रविवारी) मुंबईत भव्य 'तिरंगा रॅली' काढण्यात येत आहे.

दादरच्या शिवाजी पार्क येथे विद्यार्थ्यांच्या लढ्याला मिळालेल्या यशाचा आनंदोत्सव साजरा केला जात आहे. तर दुसरीकडे शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि मंत्री संजय शिरसाट यांनी अभिजीत दिपकेंच्या घरी जात अभिजीतच्या आई-वडिलांची भेट घेतली आहे. मंत्री संजय शिरसाट यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये दिपकेंच्या





कुटुंबीयांची भेट घेतली आहे.

दिल्लीतील आंदोलनाला यश मिळाल्यानंतर मंत्री संजय शिरसाठ यांनी छत्रपती संभाजीनगर येथे अभिजीत दिपके यांच्या आई-वडिलांची भेट घेतली. दिपके कुटुंबाशी आमचे नातेसंबंध आहेत.

आंदोलनादरम्यान प्रकरणाला राजकीय वळण लागू नये म्हणून घरी आलो नव्हतो. आता अभिजीतच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी आलो असून सरकार त्याची योग्य ती काळजी घेईल, अशी प्रतिक्रिया मंत्री संजय शिरसाठ यांनी दिली. तर, मंत्री शिरसाठ यांनी दिलेल्या स्पष्टीकरणामुळे मनातील प्रश्न मिटला. आंदोलनादरम्यान राजकारण होऊ नये म्हणून आंदोलनाच्या काळात ते आले नव्हते. आंदोलनाला यश मिळाल्याचा आनंद असल्याची प्रतिक्रिया अभिजीत दिपके यांचे वडील भगवान दिपके यांनी दिली.

दरम्यान, शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि मंत्री संजय शिरसाट हे छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री आहेत. मोदी सरकारच्या गेल्या १२ वर्षांच्या कार्यकाळात जे काम विरोधी पक्षांना जमलं नाही, ते काम 'जेन झी' विद्यार्थ्यांच्या ऐतिहासिक आंदोलनानं करून दाखवलं आहे. असे असताना या लढ्यासाठी खऱ्याअर्थाने पुढाकार घेऊन लढ्याला पूर्णत्वाकडे वाट करून देणारं नेतृत म्हणजेच अभिजित दिपके हे ठरले आहे. अशातच पालकमंत्री या नात्याने आता शिवसेनेचे नेते संजय शिरसाट यांनी अभिजीत दिपकेंच्या आई-वडिलांची भेट घेत चर्चा केली आहे.

एकीकडे, धर्मेंद्र प्रधान हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळातील अत्यंत महत्त्वाचे आणि पॉवरफुल मंत्री मानले जात होते. त्यांच्या या राजीनाम्यानंतर देशभरातील राजकीय वतुर्ळात प्रचंड खळबळ उडाली आहे. तर दुसरीकडे आता मंत्री संजय शिरसाट यांची भेट अनेक अर्थाने महत्वाची मनाली जात आहे.

## कोण आहे अभिजीत दीपके?

मूळ गाव : हिंगोली जिल्ह्यातील संतुक पिंपरी.

वास्तव्य : वडिलांच्या नोकरीमुळे छत्रपती संभाजीनगर येथे शिक्षण व वास्तव्य.

शिक्षण : पुण्यातून पत्रकारितेचे शिक्षण, त्यानंतर अमेरिकेतील बोस्टन विद्यापीठातून पब्लिक रिलेशन्समध्ये एम.एस्सी.

अनुभव : २०२० ते २०२२ दरम्यान 'आम आदमी पार्टी'च्या सोशल मीडिया टीममध्ये प्रमुख स्वयंसेवक म्हणून काम. २०२० च्या दिल्ली निवडणुकीतील अनेक प्रसिद्ध राजकीय मीम्सची संकल्पना त्याचीच होती.

'कॉकरोच जनता पार्टी'ची स्थापना कशी झाली?

या पक्षाच्या स्थापनेमागे सरन्यायाधीशांची एक टिप्पणी कारणीभूत ठरली. १५ मे २०२६ रोजी बोगस पदव्यांशी संबंधित एका सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी ''काही बेरोजगार लोक झुरळांसारखे (कॉकरोच) असतात, जे सोशल मीडिया आणि आरटीआयच्या माध्यमातून सरकारला ट्रोल करतात,'' अशी टिप्पणी केली होती. या वक्तव्याला उपरोधिक उत्तर देण्यासाठी १६ मे रोजी अभिजीत दिपकेने 'कॉकरोच जनता पार्टी'ची स्थापना केली. सोशल मीडियावर पक्षाचे सदस्यत्व जाहीर करताच काही दिवसांतच सीजेपी चे फॉलोअर्स भाजप-काँग्रेससारख्या बड्या पक्षांपेक्षाही अधिक झाले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### रस्त्याअभावी वृद्धाचा मृतदेह बैलगाडीतून; सुकाणे गावातील घटना, मूलभूत सुविधांवर प्रश्नचिन्ह



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक। प्रतिनिधी :** नाशिक जिल्ह्यातील कसबे तालुक्यातील सुकाणे गावात रस्त्याच्या अभावामुळे एका वृद्धाचा मृतदेह बैलगाडीतून गावात आणण्याची वेळ नातेवाईक आणि ग्रामस्थांवर आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे ग्रामीण भागातील अपुऱ्या मूलभूत सुविधांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

माहितीनुसार, सुकाणे येथील रहिवासी संपतराव काळे यांचे निधन झाल्यानंतर त्यांच्या वस्तीपर्यंत जाण्यासाठी योग्य रस्ता नसल्याने कोणतेही चारचाकी वाहन किंवा शववाहिका पोहोचू शकली नाही. त्यामुळे नातेवाईक आणि ग्रामस्थांनी चिखलमय व दुर्गम रस्त्यावरून बैलगाडीतून त्यांचा मृतदेह गावात आणला.

या घटनेचा व्हिडिओ आणि छायाचित्रे सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. अनेक वर्षांपासून रस्त्याची मागणी करूनही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. दरम्यान, या घटनेनंतर संबंधित प्रशासनाने तातडीने दखल घेऊन सुकाणे गावातील रस्त्याचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. ग्रामीण भागात आजही मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे हे वास्तव या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

# आषाढी वारीत ७.४७ लाखांहून अधिक वारकऱ्यांना मोफत आरोग्य सेवा

## मधुमेह, ताप, उच्च रक्तदाबासह विविध आजारांवर प्रभावी उपचार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार तसेच सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी वारी २०२६ दरम्यान सार्वजनिक आरोग्य विभागाने वारकरी भाविकांना व्यापक व दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली. 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या उपक्रमांतर्गत ७ लाख ४७ हजार १७८ वारकरी भाविकांना मोफत आरोग्य सेवा देण्यात आली असून, विविध आजारांवरील तपासणी व उपचारांमुळे हजारो वारकऱ्यांना वेळेवर वैद्यकीय मदत मिळाली.

वारीदरम्यान पालखी मार्ग आणि पंढरपूर येथील आरोग्य शिबिरांमध्ये ७ लाख ४२ हजार ७३१ बाह्यरुग्णांवर उपचार करण्यात आले. ४ हजार ४४७ रुग्णांना आंतररुग्ण सेवा देण्यात आली, तर १ हजार ६०० रुग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात आले.





वारीदरम्यान संसर्गजन्य आणि असंसर्गजन्य आजारांवरही प्रभावी उपचार करण्यात आले. त्यामध्ये ४० हजार ९३३ तापाचे रुग्ण, ११ हजार ४८६ उच्च रक्तदाबाचे रुग्ण, ९ हजार ९७३ मधुमेहाचे रुग्ण, २३ हजार १०२ तीव्र श्वसन संसर्ग रुग्ण, १९ हजार ४७७ अतिसार, ५ हजार ४५५ आमांशाचे (डिसेंट्री) रुग्ण, तसेच २१४ रस्ते अपघातग्रस्त, ५१ हृदयविकाराच्या झटक्याचे रुग्ण, ३६५ श्वानदंशाची प्रकरणे आणि १ सर्पदंशाचे प्रकरण यांच्यावर उपचार करण्यात आले. याशिवाय ३ क्षयरोगाचे रुग्ण आढळून आले असून इतर ६ लाख २९ हजार ६२९ रुग्णांनाही आवश्यक आरोग्य सेवा देण्यात आली.

वारकऱ्यांच्या सेवेसाठी पालखी मार्गावर ३५३ रुग्णवाहिका, ६९ सुसज्ज आयसीयू, १५६ 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना', २१५ आरोग्यदूत, ३,०८७ वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी आणि ३०२ तज्ज्ञ डॉक्टर कार्यरत होते. याशिवाय प्रथमच एअर ॲम्बुलन्स सेवा, 'आरोग्यसंपन्न वारी' वेब ॲप, पंढरपूरमधील २४ तास आयसीयू सुविधा, महाआरोग्य शिबिर, मोफत चष्मा वाटप, पाणी स्रोतांचे निर्जंतुकीकरण, डेंग्यू-मलेरिया प्रतिबंधात्मक उपाययोजना, आरोग्य जनजागृती आणि डिजिटल मॅपिंग यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक आरोग्य विभागाने वारीच्या संपूर्ण कालावधीत वारकरी भाविकांना सुरक्षित, सुलभ आणि तातडीची आरोग्य सेवा उपलब्ध करून देत 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' ही संकल्पना यशस्वीपणे साकार केली.

'आरोग्यसंपन्न वारी' वेब ॲपला वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; १ लाख ८ हजार ३८ वारकरी भाविकांनी घेतला लाभ

मुख्यमंत्री सचिवालय, मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष आणि सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी वारी २०२६ निमित्त विकसित करण्यात आलेल्या 'आरोग्यसंपन्न वारी' वेब ॲपला वारकरी भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. १ लाख ८ हजार ३८ वारकरी भाविकांनी या वेब ॲपचा लाभ घेतला असून, वारीदरम्यान आवश्यक आरोग्य सेवा व इतर सुविधा सहज उपलब्ध झाल्याने भाविकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या लाखो वारकरी भाविकांना सुरक्षित, सुलभ आणि तात्काळ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे वेब ॲप विकसित करण्यात आले. या माध्यमातून रुग्णवाहिका सेवा, डॉक्टरांची माहिती, आरोग्य केंद्रे, 'आपला दवाखाना', पिण्याच्या पाण्याची ठिकाणे, स्वच्छतागृहे, मुक्काम व विसावा स्थळे तसेच महत्त्वाचे संपर्क क्रमांक यांसह विविध अत्यावश्यक सेवांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध करून देण्यात आली होती.

आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत मिळावी, वारकऱ्यांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि नियोजनबद्ध व्हावा तसेच आवश्यक आरोग्य सेवा वेळेत उपलब्ध व्हाव्यात, या दृष्टीने हे वेब ॲप प्रभावी ठरले. विशेष म्हणजे वारीदरम्यान अनेक वारकरी भाविकांनी या वेब ॲपचा वापर करून विविध सेवांचा लाभ घेतला आहे.

### पोलीस, बनावट पत्रकार अनब १ कोटींची कॅश! खाकी वर्दीच निघाली व्हिलन; चौकी समोरच्या हॉटेलच्या सीसीटीव्हीने सगळ्यांचं भांड फुटलं

**मुंबई । प्रतिनिधी :** पुण्यातील गुन्हेगारीचं आणि चोरीचं प्रमाण गेल्या काही दिवसांपासून वाढतच असल्याचं चित्र पहायला मिळत होतं. अशातच आता पोलीस हात साफ करायला लागलेत का? असा सवाल विचारला आहे. पुण्यात एका व्यापाऱ्याला गाठून १ कोटी रुपयांची रोख रक्कम लुटल्याची खळबळजनक घटना नुकतीच घडली होती. या मोठ्या गुन्ह्याचा तपास सुरू असतानाच पोलिसांसमोर एक धक्कादायक चित्र समोर आले आहे. नऱ्हे परिसरात घडलेल्या या दरोड्याच्या संपूर्ण कटात चक्क खाकी वर्दीतील एका महिला कर्मचाऱ्यासह तोतया पत्रकाराचा सहभाग असल्याचे उघडकीस आले आहे.

खेड शिवापूर पोलिस चौकीत काय घडलं?

पुण्यातील एका व्यापाऱ्याची तब्बल एका कोटीची लुट करण्यात आली होती. आठ दिवसांपूर्वी घडलेल्या या लुटीच्या घटनेनंतर आरोपी रोकड भरलेली गाडी घेऊन थेट खेड शिवापूर पोलिस चौकीत दाखल झाले होते. लुटीची गाडी घेऊन आरोपी थेट पोलिस चौकीत पोहोचल्यामुळे संशयाची मोठी सुई निर्माण झाली होती. चौकीमध्ये पोहोचल्यानंतर या रकमेतील २० लाख रुपयांचा बेकायदेशीर आर्थिक लाभ मिळवण्यासाठी आरोपींची मोठी धडपड सुरू झाली होती.

चौकीतच सुरू असलेला हा संशयास्पद प्रकार तिथल्या काही लोकांच्या लक्षात आला. या बेकायदेशीर व्यवहाराचा प्रकार शेजारील एका हॉटेलच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला होता. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून राजगडचे पोलिस निरीक्षक संतोष जाधव यांनी तातडीने खेड शिवापूर चौकीत धाव घेतली. त्यांनी तिथून सर्व रोकड आणि आरोपींना ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी नऱ्हे पोलिसांच्या स्वाधीन केलं. पण यानंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले. पोलिस निरीक्षक जाधव यांनी चौकीतील प्रकाराचा गोपनीय रिपोर्ट तयार करून पुणे ग्राम ीणचे पोलिस अधीक्षक संदीप सिंह गिल यांना पाठवला. या रिपोर्टनुसार आणि नऱ्हे पोलिसांच्या पुढील तपासात धक्कादायक माहिती उघड झाली.

### समृद्धी महामार्गावर सिंदखेडराजा येथे तिहेरी अपघात, ५ जखमी




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा। प्रतिनिधी :** लोकार्पणापासूनच अपघातासाठी चर्चेत असलेल्या समृद्धी महाम ार्गावर आज रविवारी पुन्हा अपघात झाला. तिहेरी विचित्र अपघातात पाच प्रवासी जखमी झाले असून त्यातील एकाची प्रकृती गंभीर आहे.

नागपूर कॉरिडॉरमध्ये रविवारी (दि. २६) झालेल्या विचित्र अपघातात अज्ञात ट्रक चालकाने अचानक 'लेन' बदलल्याने हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. अपघातानंतर समृद्धी महामार्ग उपकेंद्र, सिंदखेडराजा येथील पोलिस, 'एमएसएफ' जवान, १०८ रुग्णवाहिका आणि वैद्यकीय पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. तसेच विस्कळीत झालेली वाहतूक सुरळीत केली

माहितीनुसार, रविवारी नियंत्रण कक्ष, छत्रपती संभाजीनगर येथून समृद्धी महामार्गावरील चॅनल क्रमांक ३३६.२०० (नागपूर कॉरिडॉर) येथे अपघात झाल्याची माहिती मिळाली.

एकमेकांवर आदळली वाहने

मुंबईहून नागपूरकडे जाणारी ट्रॅव्हल्स (क्रमांक एम एच १४ एल एक्स १३२०) अज्ञात ट्रकच्या मागे जात होती. समोरील ट्रक चालकाने अचानक लेन बदलल्यामुळे ट्रॅव्हल्सची ट्रकला पाठीमागून धडक बसली. यानंतर मागून येणाऱ्या म हिंद्रा (क्रमांक एम एच ४३ सी यू ११६१) या कारनेही ट्रॅव्हल्सला जोरदार धडक दिल्याने हा विचित्र अपघात घडला. या अपघातात ट्रॅव्हल्समधील विनोद नागोश (वय ४७) व खलील खान (वय ५५) हे किरकोळ जखमी झाले. त कारम धील प्रणव मिश्रा (वय ४४) आणि मोहित मिश्रा यांनाही किरकोळ दुखापत झाली. मनीष पांडे यांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

उपचार आणि वाहतूक ठप्प

अपघाताची माहिती मिळताच विविध दलाचे जवान, तसेच १०८ रुग्णवाहिका चालक दिगांबर शिंदे व सुशील मरमट यांनी घटनास्थळी धाव घेतली. डॉ. वैभव बोराडे आणि डॉ. यासीन शहा यांनी जखमीवर प्राथमिक उपचार करून त्यांना तातडीने सिंदखेडराजा येथील रुग्णालयात हलविले. अपघातानंतर वाहने महामार्गाच्या १२० किमी प्रतितास वेगाच्या लेनमध्ये होती. क्रेनच्या सहाय्याने वाहने हटविण्यात आली. पोलिसांनी तात्काळ बॅरिकेटीग करून वाहतूक सुरळीत केली. या प्रकरणी अज्ञात ट्रक चालकाचा शोध घेण्यात येत आहे. पुढील तपास सिंदखेडराजा पोलीस करीत आहेत.

पान १ वरून...

### मुंबईत ठाकरेंची जल्लोष सभा

केंद्र सरकारला माघार घ्यावी लागली आणि धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला.

राज ठाकरे म्हणाले, महाराष्ट्राच्या पोलिसांचे मी आभार मानतो. त्यांनी दाखवून दिले की दिल्लीतले पोलिस आणि महाराष्ट्राचे पोलिस कसे आहेत हे त्यांनी दाखवून दिले. त्यांनी खरोखर चांगले काम केले आणि सहकार्य केले. उद्धव ठाकरे म्हणाले, कधी कधी शब्दांच्या पेक्षा कृती महत्त्वाची ठरते आणि तुम्ही सगळ्यांनी देशातील इतिहाच्या पुस्तकातील एक सुवर्ण पान लिहिले आहे. याची नोंद इतिहासात केल्याशिवाय कोणी राहणार नाही. आता आलेली ही जाग जाऊ देऊ नका. या देशाला दाखवून द्या. जय हिंद! जय महाराष्ट्र!

उद्धव ठाकरे म्हणाले, मी देशातील तमाम देशभक्तांना अभिवादन करत आहे. आज कोणतीही निवडणूक नाही, पण अंधभक्तांच्या विरोधात देशभक्त जिंकले आहेत. हा संघर्ष भाजप विरुद्ध भारत असा आहे, यात आपण सर्वजण जात-पात धर्म विसरून होय मी देशभक्त आहे या एकच भावनेने एकत्र आलात. एका झुरळाने हुकूमशाहाला हरवले आहे.

पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, मला मोदीजी यांना सांगायचे आहे की आता तरी देशाचे काम करावे. तुमचे नेते पक्ष फोडण्यात व्यस्त आहेत. अर्थमंत्री निर्मला सितारमन घसरत्या रुपायबद्दल बोलत नाहीत, पण पेपरफुटीचे फायदे सांगत आहेत. राजनाथ संरक्षण मंत्री, देशाच्या संरक्षणाची बोंब पण धर्मेंद्र प्रधान यांच्या संरक्षणसाठी पुढे आले. आपले खड्डा मंत्री, नाही, रस्ता मंत्री , ते इथेनोलवर बोलत आहेत. मोदींना सांगायचे आहे की लाडक्या धर्मेंद्रला काढताना किती यातना झाल्या, त्यापेक्षा किती तरी जास्त यातना, या मुलांनी जीव दिला, त्यांच्या पालकांना किती यातना झाल्या हे तुम्हाला कळणार नाही.उद्धव ठाकरे म्हणाले, निवडणुका गेल्या खड्ड्यात, कारण आता मोदींनी पाहिले आहे की मत चोरता येतात, लोकं चोरता येत नाही. मन चोरता येत नाही. ही मन आता पेटलेली आहेत, ही ठिणगी पेटलेली ठेवणे हे आपले काम आहे. हे अंधभक्त मुलांना धमक्या देत आहेत. त्यांचे व्हिडिओ शेयर करा आणि त्यांना खरे हिंदुत्व शिकवा.

राज ठाकरे म्हणाले, आजचा दिवस हा काही भाषण करण्याचा नव्हे. तुम्ही जे आंदोलन पेटवले होते, त्याला जे यश आले, त्याचा उत्साह साजरा करण्यासाठी आपण इथे जमलो आहोत. या देशातले जेनझी या सरकारच्या जेनझ्या कशा उपटताट हे या आंदोलनातून कळले. आज मी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट नमूद करणे आवश्यक आहे, नीटच्या परीक्षा, आंदोलन आणि त्यानंतर आपल्या देशभरातल्या अनेक परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. यावेळी राज ठाकरे यांनी सर्व २१ विद्यार्थ्यांची नावे बोलून दाखवली आणि त्यांना आदरांजली वाहिली.

### 'धन्यवाद मोदीजी' या कार्यक्रमातून विद्यार्थी, युवकांसाठी मोदीजींनी घेतलेला प्रत्येक ऐतिहासिक निर्णय जनतेपर्यंत पोहोचविणार : मंगलप्रभात लोढा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेहमीच देशाच्या युवा पिढीचा विचार केला असून, भविष्यातही त्यांच्या शिक्षण, कौशल्य विकास, रोजगार आणि सक्षमीकरणासाठी ते तितक्याच बांधिलकीने कार्य करत राहतील. आज भारताकडे जगातील सर्वाधिक युवा शक्ती हीच मोठी ताकद आहे, आणि देशविरोधी शक्तींनाही याची जाणीव आहे. त्यामुळेच खोटे आरोप आणि फेक नॅरेटिव्हच्या माध्यमातून युवकांची दिशाभूल केली जात आहे; मात्र हा अपप्रचार आम्ही यशस्वी होऊ देणार नाही, असे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी म्हटलं आहे. भारतीय जनता पक्षाच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने विद्यार्थी व युवकांसाठी घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'धन्यवाद मोदीजी' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत केंद्र सरकारच्या योजना फलकांच्या (बॅनर्स) माध्यमातून थेट नागरिकांपर्यंत पोहोचवल्या जाणार आहेत. उद्या २७ जुलै रोजी मुंबई हा कार्यक्रम होणार आहे.



या कार्यक्रमादरम्यान फलकांच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या खालील महत्त्वपूर्ण उपक्रमांची सविस्तर माहिती नागरिकांना दिली जाईल. राष्ट्रीय शिक्षण धोरण (ऱ्एझब २०२०), मल्टिपल एन्ट्री आणि एक्झिट प्रणाली, इ्शब एप्ठघब शाळा, इ्शब ।-न्न्घ्ऊभ्अ, ऊख्एप्अ पोर्टल, तसेच प्रधानमंत्री विद्यालक्ष्मी योजना आणि प्रधानमंत्री शिष्यवृत्ती योजना, घ्घ्ऊ, घ्घ्शब आणि अघ्घ्श्ए या संस्थांचा विस्तार, स्किल इंडिया अभियान, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (इ्श्ख्न्भ), आणि इ्श-एएऊळ आणि संकटकाळात भारतीय विद्यार्थ्यांना सुरक्षित मायदेशी आणणारी 'ऑपरेशन गंगा'

मंगलप्रभात लोढा म्हणाले, विरोधकांकडे विकासाची कोणतीही ठोस दृष्टी नाही, त्यामुळे ते आंदोलने, अपप्रचार आणि फेक नॅरेटिव्हचा आधार घेऊन युवकांमध्ये संभ्रम निर्माण करत आहेत. मात्र, सत्य जनतेसम ोर आणणे ही आमची जबाबदारी आहे. 'धन्यवाद मोदीजी' हा केवळ एक कार्यक्रम नसून देशाच्या युवा शक्तीने अनुभवलेल्या सकारात्मक परिवर्तनाबद्दल व्यक्त केलेली कृतज्ञता आहे.

या विशेष कार्यक्रमात भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, भारतीय जनता युवा मोर्चा, महिला मोर्चाचे कार्यकर्ते, विविध शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थी, तरुण आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. केंद्र सरकारच्या युवककेंद्रित धोरणांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नागरिकांसाठी २९ शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली- अपर जिल्हाधिकारी बप्पासाहेब थोरात

## भारतरत्न राजीव गांधी जिल्हा क्रीडा संकुल येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** महसूल विभाग अधिक लोकाभिमुख, पारदर्शक व गतिमान करण्याच्या उद्देशाने शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील शेवटच्या नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी मुंबई शहर जिल्ह्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर' अभियान राबविण्यात येत असल्याचे मुंबई शहर जिल्ह्याचे अपर जिल्हाधिकारी बप्पासाहेब थोरात यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर यांच्यावतीने दि. २२ जुलै ते २ ऑगस्ट २०२६ या कालावधीत मुंबई शहरातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात या अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अंतर्गत १७८-धारावी विधानसभा मतदारसंघातील भारतरत्न राजीव गांधी जिल्हा क्रीडा संकुल येथे शिबीर पार पडले.

अपर जिल्हाधिकारी थोरात म्हणाले की, राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये हे अभियान राबविण्यात येत असून शासनाच्या विविध योजना व सेवा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत 'एकाच छताखाली' पोहोचविण्याचा हा प्रशासनाचा प्रयत्न आहे. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दिले जाणारे विविध महसुली दाखले, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवा, आधार सेवा, दिव्यांग सेवा, संजय गांधी निराधार योजना, रेशन कार्डविषयक सेवा आदींसह एकूण २९ सेवा या शिबिरात उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यासाठी १९ स्टॉल उभारण्यात आले असून नागरिकांनी या सुविधांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा.

यावेळी धारावीच्या आमदार डॉ. ज्योती गायकवाड यांनी धारावीतील कष्टकरी व सर्वसामान्य नागरिकांपर्यंत शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी हे अभियान महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे सांगितले.

यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात १०९ लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमासाठी मुंबई शहरचे उपजिल्हाधिकारी अजित नैराळे,




जिल्हा नियोजन अधिकारी संजयकुमार शिंदे तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. पंकज चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले, तर निवासी उपजिल्हाधिकारी शिवनंदा लंगडापुरे यांनी आभार मानले.

## वृत्तविशेष...

### धर्मेंद्र प्रधान राजीनाम्यानंतर फेसबुक पोस्ट डिलीट?



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर । प्रतिनिधी :** केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर जंतर-मंतरसह इतर शहरांमध्ये हजारो जेन-झी तरुण आंदोलकांनी जल्लोष केला. यानंतर आता अनेक लोक आपापल्या पद्धतीने समाजबद्धमांवर व्यक्त होतात. मात्र धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनामा संदर्भात किंवा केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात कुठलीही पोस्ट फेसबुक या सोशल मीडियामध्ये लिहिल्यास ती तात्काळ तिथून डिलीट केली जात आहे. नेमका काय प्रकार घडला पाहूया.

या घडामोडींवर सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात प्रतिक्रिया उमटू लागल्या. मात्र, त्याचवेळी फेसबुकवर सरकारविरोधी किंवा धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याशी संबंधित पोस्ट हटवल्या जात असल्याचा दावा अनेक वापरकर्त्यांनी केला आहे. त्यामुळे सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील अभिव्यक्ती स्वातंत्र्य, कंटेंट मॉडरेशन आणि डिजिटल सेन्सॉरशिपचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

नेमका दावा काय?

काही फेसबुक वापरकर्त्यांनी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याचे स्वागत करणाऱ्या किंवा केंद्र सरकारवर टीका करणाऱ्या पोस्ट काही मिनिटांतच हटवल्या गेल्याचा दावा केला आहे. नागपूर मधील एका प्राध्यापकाने या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर एक लेख फेसबुकवर शेअर करतात दुसऱ्याच मिनिटाला तो डिलीट करण्यात आला आहे. तर काहींनी पोस्ट 'कम्युनिटी स्टँडर्ड्स'चे उल्लंघन केल्याचे कारण दाखवत काढून टाकल्याचे सांगितले, तर काहींनी त्यांच्या पोस्ट इतरांना दिसत नसल्याचा आरोप केला आहे. या संदर्भातील काही स्क्रीनशॉट आणि अनुभव सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

फेसबुक पोस्ट का हटवते?

सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एखादी पोस्ट हटविण्यामागे अनेक कारणे असू शकतात. त्यामध्ये प्लॅटफॉर्मची 'कम्युनिटी स्टँडर्ड्स', कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित स्वयंचलित तपासणी, इतर वापरकर्त्यांनी केलेल्या तक्रारी किंवा न्यायालय अथवा सक्षम सरकारी यंत्रणांकडून आलेल्या वैध कायदेशीर मागण्या यांचा समावेश असू शकतो. त्यामुळे एखादी पोस्ट हटवण्यात आली म्हणजे ती राजकीय कारणांमुळेच हटविण्यात आली, असा निष्कर्ष तातडीने काढता येत नाही.

अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर पुन्हा चर्चा

या प्रकरणी मेटा (फेसबुकची मूळ कंपनी) किंवा केंद्र सरकारकडून कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण समोर आलेले नाही. तसेच, सरकारविरोधी पोस्ट मुद्दाम हटविण्यात येत असल्याचा दावा स्वतंत्रपणे पडताळला गेलेला नाही. सोशल मीडियावरील मजकूर हटविण्याच्या घटनांमुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या जबाबदाऱ्यांबाबतचा वाद पुन्हा ऐरणीवर आला आहे. एका बाजूला द्वेषपूर्ण, हिंसाचाराला चिथावणी देणारा किंवा दिशाभूल करणारा मजकूर रोखण्याची जबाबदारी प्लॅटफॉर्मवर आहे, तर दुसऱ्या बाजूला वैचारिक मतप्रदर्शनावर अनावश्यक निर्बंध येऊ नयेत, अशी मागणीही सातत्याने केली जाते.

सोशल मीडियावर व्हायरल होणारे दावे आणि स्क्रीनशॉट हे स्वत:मध्ये अंतिम पुरावा मानले जाऊ शकत नाहीत. त्यामुळे अशा दाव्यांची स्वतंत्र पडताळणी होईपर्यंत त्याकडे सावधपणे पाहणे आवश्यक आहे. संबंधित प्रकरणात अधिकृत माहिती किंवा स्पष्टीकरण समोर आल्यानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकणार आहे.

### कल्याणच्या ओटीआर एजंटची ११ लाखांची फसवणूक; निवृत्त लष्करी अधिकाऱ्यावर गुन्हा

**कल्याण । प्रतिनिधी :** आपल्या मुलाला आम्ही इन्कम टॅक्स विभागात, नाशिकच्या आरोग्य सेवा विभागात नोकरीला लावतो असे सांगून उल्हासनगरच्या एका आर. टी. ओ. एजंटची लष्करातून सेवानिवृत्त झालेल्या लष्करी अधिकाऱ्याने ११ लाख रूपयांची फसवणूक केली आहे. गेल्या वर्षी हा फसवणुकीचा प्रकार घडला आहे. महात्मा फुले पोलीस ठाण्यात या फसवणूक प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आर. टी. ओ. मध्यस्थ युसुफ लोटन पिंजारी यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी सैन्य दलातून सेवानिवृत्त झालेले नाशिक येथील रहिवासी भरत अशोक देवरे, त्यांचे सहकारी बबन भाऊसाहेब गायकवाड यांच्या विरूध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार पिंजारी कल्याण उपप्रादेशिक परिवहन विभाग परिसरात मध्यस्थ म्हणून काम करतात.

पिंजारी यांनी तक्रारीत म्हटले आहे, की आपला मुलगा वाणिज्य पदवीधर झाला आहे. आपण त्याला नोकरी मिळण्यासाठी प्रयत्नशील होतो. आपला जळगाव चाळीसगाव येथील भाचा मुस्ताक पिंजारी यांनी गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये आपणास सांगितले, की आपल्या गावातील संजय साळुंके हे सैन्य दलातून निवृत्त झाले आहेत. त्यांच्या सोबत सैन्य दलातून निवृत्त झालेल्या भरत देवरे यांनी अनेक मुलांना नोकऱ्या लावल्या आहेत. देवरे हे नाशिक येथे राहतात.

# आषाढी एकादशीनिमित्त भाविकांची सेवा;

# किशोरभाऊ गारोळे यांच्या लोकप्रियतेची पुन्हा प्रचिती

## युवकांपासून ज्येष्ठांपर्यंत 'किशोरभाऊ' नावाविषयी वाढते प्रेम

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर । प्रतिनिधी :** मेहकर नगर परिषदेचे नगराध्यक्ष तथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे युवा नेतृत्व किशोरभाऊ गारोळे यांच्या वाढत्या लोकप्रियतेची प्रचिती आषाढी एकादशीनिमित्त पुन्हा एकदा पाहायला मिळाली. जनतेशी जपलेले आपुलकीचे नाते आणि सामाजिक कार्यातील सातत्य यामुळे किशोरभाऊ हे आज सर्वसामान्यांचे नेतृत्व म्हणून ओळखले जात आहेत.

आषाढी एकादशीनिमित्त परतापूर येथे समस्त गावकरी मंडळींच्या वतीने श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांसाठी फराळ वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला नगराध्यक्ष किशोरभाऊ गारोळे यांनी सदिच्छा भेट देत विठ्ठलाचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांनी भाविकांना स्वतः फराळाचे वाटप करत आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या साधेपणाने आणि सेवाभावी वृत्तीने उपस्थित भाविकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले. यावेळी दत्ता घनवट, राजू घनवट, उमेशजी चनखोरे यांच्यासह समस्त गावकरी व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, धार्मिक आणि जनहिताच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतल्यामुळे किशोरभाऊ गारोळे यांनी जनतेचा विश्वास संपादन केला आहे. काही महिन्यांपूर्वी झालेल्या नगर परिषद निवडणुकीत जनतेने त्यांच्यावर विश्वास व्यक्त करत नगराध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली. नगराध्यक्ष झाल्यानंतरही त्यांनी जनतेशी असलेला थेट संवाद कायम ठेवला असून विकासकामे, नागरिकांच्या समस्या सोडविण्याची तत्परता आणि प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची त्यांची भूमिका यामुळे त्यांचा जनसंपर्क अधिक मजबूत झाला आहे.

विशेष म्हणजे, लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वजण त्यांना प्रेमाने 'किशोरभाऊ' म्हणून हाक मारतात.



युवकांमध्येही त्यांचे विशेष आकर्षण असून, आपुलकीचे नाते जपणारा नेता म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. त्यामुळे मेहकर शहरासह संपूर्ण मतदारसंघात किशोरभाऊ गारोळे यांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे.

# डोणगाव पोलिसांचा दणका! बेकायदेशीर पेट्रोल साठा उघड, आरोपीवर गुन्हा

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव । प्रतिनिधी :** डोणगाव पोलिसांनी बेकायदेशीर इंधन साठवणुकीविरोधात मोठी कारवाई करत मेहकर तालुक्यातील अंजनी बु. येथे छापा टाकून २७० लिटर पेट्रोलसह सुमारे ३४,२६४ किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी एका युवकाविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, दि. २६ जुलै २०२६ रोजी डोणगाव पोलीस ठाण्याच्या पथकाने ग्राम अंजनी बु. येथील रहिवासी एका २५ वर्षीय युवकाच्या घरावर पंचांसमक्ष धाड टाकली. तपासणीदरम्यान कोणताही



वैध परवाना नसताना विक्रीच्या उद्देशाने साठवून ठेवलेले २७० लिटर पेट्रोल तसेच आठ प्लास्टिकचे कॅन आढळून आले.

पोलिसांनी घटनास्थळीच पेट्रोल व प्लास्टिक कॅन असा एकूण ३४,२६४ किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी डोणगाव पोलीस ठाण्यात अप. क्र. २३५/२०२६ अन्वये जीवनावश्यक वस्तू अधिनियमाच्या कलम ३ व ७ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ही कारवाई डोणगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार गणेश इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने केली. बेकायदेशीर इंधन साठवणूक व विक्री करणाऱ्यांविरोधात यापुढेही कठोर कारवाई सुरू राहील, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

### १८ वर्षीय अनाहतनं रचला इतिहास! जागतिक ज्युनियर स्क्वॅश विजेतेपद जिंकणारी पहिली भारतीय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** भारताच्या अनाहत सिंगनं ज्युनियर स्क्वॅश विश्वचॅम्पियनशिपचे विजेतेपद पटकावलं आहे. विशेष म्हणजे हे विजेतेपद जिंकणारी अनाहत ही पहिली भारतीय ठरली आहे. अंतिम सामन्यात अनाहतचा सामना इजिप्तच्या रुकाया सालेम (दुसरी मानांकित) हिच्याशी झाला. कॅनडामध्ये झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात अनाहतनं रुकायाचा ११-३, ११-७, ११-९ असा पराभव केला. अनाहतचा हा विजय अनेक अर्थांनी ऐतिहासिक आहे. कारण, २१ वर्षांनंतर एका भारतीय खेळाडूनं केवळ अंतिम फेरी गाठली नाही, तर देशासाठी विजेतेपदही मिळवून दिलं.

तिन्ही सेटमध्ये अनाहतचं वर्चस्व : अनाहत सिंगनं इजिप्तच्या रुकाया सालेमला पहिल्या सेटमध्ये ११-३ नं हरवलं आणि त्यानंतर दुसरा सेट ११-७ नं जिंकण्यात यश मिळवलं. आता सर्वांचं लक्ष सामन्याच्या तिसऱ्या सेटवर होतं, जो अनाहत सिंगनं ११-९ नं जिंकून विजेतेपद पटकावलं. २००५ मध्ये जोशना चिनप्पानंतर अंतिम फेरीत पोहोचणारी अनाहत सिंग ही पहिली भारतीय ठरली आहे. चिनप्पा स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचली होती, परंतु तिचं विजेतेपद थोडक्यात हुकलं.

केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनीही अनाहतचं या ऐतिहासिक विजयाबद्दल अभिनंदन केलं. त्यांनी सोशल मीडि पोस्ट करत म्हटलं, ''इतिहास घडला! वर्ल्ड स्क्वॅश ज्युनियर चॅम्पियनशिप जिंकणारा पहिला भारतीय ठरल्याबद्दल अनाहत सिंगचं मन:पूर्वक अभिनंदन! ही अभूतपूर्व कामगिरी प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण आहे.

# विदर्भ राज्याच्या मागणीसाठी फडणवीस-गडकरी यांच्या घरासमोर मोर्चाचा इशारा






दैनिक आपला विदर्भ

**सिंदखेडराजा । प्रतिनिधी :** विदर्भ राज्य निर्मितीच्या मागणीसाठी विदर्भवादी नेत्यांनी पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेतली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे रविवारी आयोजित विदर्भ राज्य निर्माण संकल्प मेळावा उत्साहात पार पडला.

यावेळी विदर्भवादी नेते वामनराव चटप आणि शिवाजीराजे भोसले यांनी आपल्या भाषणातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली.


"विदर्भ वेगळा होणार नाही, तोपर्यंत लग्न करणार नाही," असे पूर्वी सांगणाऱ्या फडणवीसांनी आता आपल्या लेकीच्या लग्नाच्या निमित्ताने विदर्भवासीयांना भेट म्हणून स्वतंत्र विदर्भ राज्याची घोषणा करावी, अशी मागणी त्यांनी केली.


तसेच, विदर्भ राज्याच्या निर्मितीबाबत सरकारने सकारात्मक निर्णय न घेतल्यास नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानासमोर मोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही विदर्भवादी नेत्यांनी दिला.

या संकल्प मेळाव्यात विदर्भ राज्याच्या मागणीला नव्याने बळ देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला असून, पुढील आंदोलनाची दिशाही स्पष्ट करण्यात आली.

# दुकानाचे कुलूप तोडून ८.९७ लाखांचे कॉपर वायर चोरी

## ३ आरोपी अटकेत, १३.९७ लाखांचा मुद्देमाल जप्त







दैनिक आपला विदर्भ

**खामगाव। प्रतिनिधी :** खामगाव शहर पोलिसांनी धडक कारवाई करत दुकानाचे कुलूप तोडून सुमारे ८ लाख ९७ हजार रुपयांचे कॉपर वायर बंडल चोरी करणाऱ्या तीन आरोपींना अटक केली आहे. आरोपींकडून चोरीचा मुद्देमाल तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेले वाहन असा एकूण १३ लाख ९७ हजार ३९२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खामगाव शहरातील एका दुकानाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी कॉपर वायरच्या बंडलची चोरी केली होती. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा समांतर तपास सुरू असताना पोलिसांनी तांत्रिक माहिती व गोपनीय सूत्रांच्या आधारे तीन संशयितांना ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान आरोपींनी चोरीची कबुली दिल्यानंतर त्यांच्याकडून चोरीस गेलेले कॉपर वायर बंडल तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेले वाहन जप्त करण्यात आले. या कारवाईत एकूण १३ लाख ९७ हजार ३९२ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास खामगाव शहर पोलीस करत आहेत.